वाचले:- १) अर्जदार अध्यक्ष, श्री. शिवाजीराव आढळराव पाटील, श्री. भैरवनाथ शिक्षण प्रसारक मंडळ, लांडेवाडी (चिंचोली) यांचा दि. २७/१२/२०१६ रोजीचा विनंती अर्ज.

२) शासन ज्ञापन क्र. जमीन-३४९५/२३३/प्र.क्र.पु. १२४६/ज-५, दि. ३० सप्टेंबर, २०००.

३) जिल्हाधिकारी कार्यालय, महसूल शाखा यांचेकडील आदेश क्र. पमग/सीआर/१५००/तीन, दि. २१/१२/२०००.

४) जिल्हाधिकारी कार्यालय, महसूल शाखा यांचेकडील , आदेश क्र. पमग/सीआर/०८/२०२०, दि. २१/१२/२०००

५) सह सचिव, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन ज्ञापन क्र. जमीन-३४१९/१३३६/प्र. क्र. २३८/ज-५, दि. ०१/१२/२०२२.

६) महाराष्ट्र शासन, महसूल व वनविभाग यांचेकडील शासन निर्णय क्र. जमीन-२०१८/प्र.क्र.९१/ज-१, दिनांक - १६/११/२०१८.

---

**जिल्हाधिकारी कार्यालय पुणे**
**(महसुल शाखा)**
क्र. जमीन/आंबेगाव/सीआर/०१/२०२२
दिनांक:-०७/१२/२०२२

**विषय:- भाडेपट्टा मुदतवाढ...**
मौजे शेवाळवाडी-लांडेवाडी (चिंचोली), ता. आंबेगाव, जि. पुणे येथील गट नंबर ११५१/१/अ मधील १०७१६.०० चौ. मी. या क्रिडांगणासाठी भाडेपट्टयाने प्रदान केलेल्या जमिनीच्या भाडेपट्टयास मुदतवाढ देणेबाबत....

आदेश,

ज्याअर्थी, मौजे शेवाळवाडी-लांडेवाडी (चिंचोली), ता. आंबेगाव, जि. पुणे येथील गट नंबर ११५१/१/अ मधील १०७१६.०० चौ. मी. या क्रिडांगणासाठी १५ वर्षे भाडेपट्याने प्रदान केलेल्या जमिनीचे भाडेपट्टयास मुदतवाढ मिळणेबाबत अध्यक्ष, श्री. शिवाजीराव आढळराव पाटील, श्री. भैरवनाथ शिक्षण प्रसारक मंडळ, लांडेवाडी (चिंचोली) यांचेकडील पत्र क्र. भैशिप्रमंला/९३५/२०१६/१७, दिनांक २७/१२/२०१६ रोजीच्या अर्जान्वये विनंती केलेली आहे.

२. ज्याअर्थी, मौजे शेवाळवाडी-लांडेवाडी, ता. आंबेगाव, जि. पुणे येथील जमीन ग. नं. ११५१/१/अ मधील १०७१६ चौ. मी. इतके क्षेत्र शासन ज्ञापन क्र. जमीन ३४९५/२३३/प्रक्रपु/१२४६/ज-५, दि. ३०/०९/२००० व तद्नुषंगीक जिल्हाधिकारी, पुणे यांच्या कार्यालयीन आदेश क्र. पमग/सीआर/१५००/तीन, दि. २१/१२/२००० अन्वये श्री. भैरवनाथ शिक्षण प्रसारक मंडळ, लांडेवाडी (चिंचोली) या शैक्षणिक संस्थेस क्रिडांगणाकरीता नाममात्र १ रूपये वार्षिक भाडे आकारून १५ वर्षाच्या कालावधीसाठी भाडेपट्टयाने प्रदान करण्यात आलेले आहे.

३. ज्याअर्थी, सह सचिव, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन ज्ञापन क्र. जमीन-३४१९/१३३६/प्र. क्र. २३८/ज-५, दि. ०१/१२/२०२२ अन्वये विभागीय आयुक्त, पुणे यांनी शासनास सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने शासन निर्णय दि. १६/११/२०१८ मधील तरतुदीनुसार, शासन अधिसुचना दि. ०६/०३/२०१९ अन्वये महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमीनींची विल्हेवाट) नियम १९७१ मधील नियम ७ मध्ये करण्यात आलेल्या सुधारित तरतुदीनुसार व महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ चे कलम २२अ व ४० तसेच सन २०११ पुर्वी प्रदान करण्यात आलेल्या गायरान जमीनीबाबत विधि व न्याय विभागाने दिलेले अभिप्राय विचारात घेता, श्री. भैरवनाथ शिक्षण प्रसारक मंडळ, लांडेवाडी (चिंचोली) या शैक्षणिक संस्थेस मौजे शेवाळवाडी-लांडेवाडी येथील गट नंबर ११५१/१/अ मधील क्रिडांगण प्रयोजनासाठी भाडेपट्टयाने प्रदान केलेल्या १०७१६.०० चौ. मी. इतक्या जमिनीच्या भाडेपट्टयास जिल्हाधिकारी पुणे यांना अटी व शर्तीच्या अधिनतेने मुदतवाढ देण्यास शासन पुर्वमान्यता देण्यात आली आहे.

४. ज्याअर्थी, महाराष्ट्र शासन, महसूल व वनविभागाकडील शासन निर्णय क्र. जमीन-२०१८/प्र.क्र.९१/ज-१, दिनांक १६ नोव्हेंबर, २०१८ मध्ये खालीलप्रमाणे तरतुदी नमुद आहेत:-

१) क्रिडांगण किंवा खेळाचे मैदान, व्यायामशाळा या प्रयोजनाच्या वापराकरिता वर नमूद केल्याप्रमाणे भाडेपट्ट्याने प्रदान केलेल्या शासकीय जमिनीवरील भाडेपट्ट्याचे नुतणीकरण करताना अशा जमिनीच्या प्रचलित वार्षिक दर विवरण पत्रानुसार येणा-या मुल्यांकनाच्या १० टक्के रकमेच्या ०.१ टक्के इतकी रक्कम वार्षिक भुईभाडयाची रक्कम म्हणून आकारण्यात यावी.

२) अशा संपुष्टात आलेल्या भाडेपट्ट्याचे नुतणीकरण मुळ जमीन प्रदान आदेशातील अटी / शर्तीच्या अधीन राहून ३० वर्ष इतक्या कालावधीपर्यंत करण्यात यावे.

३) ज्या भाडेपट्टयांचा कालावधी या शासन निर्णयाच्या दिनांकापुर्वी संपुष्टात आलेला असून व ज्या भाडेपट्टयांचे अद्याप नुतनीकरण करण्यात आलेले नाही, अशा भाडेपट्ट्यांचे मानीव नुतनीकरण भाडेपट्टा संपुष्टात आल्याच्या दिनांकापासून दि. ३१.१२.२०१७ पर्यंत जुन्या दराने भुईभाडे वसुल करण्यात यावेत व दि. ०१.०१.२०१८ पासुन प्रस्तुत धोरणानुसार भुईभाडे वसुल करुन भाडेपट्टयाचे पुढील नुतनीकरण करण्यात यावे. अशा प्रकारे वार्षिक भुईभाडयाची रक्कम आकारणी करताना थकीत भुईभाडयावर व्याज आकारणी करण्यात येऊ नये.

४) संबंधित जिल्हयाचे जिल्हाधिकारी, अशा उक्त नमुद भाडेपट्टयाचे नुतनीकरण करण्यास सक्षम असतील (तथपि, बृहन्मुंबई क्षेत्रातील भाडेपट्टयाचे नुतनीकरणासाठी शासनाची मान्यता घेणे आवश्यक आहे.)

५) तसेच, संबंधित पट्टाधारक संस्थेने शर्तभंग केलेला असल्यास, अशा भाडेपट्टयाचे नुतनीकरण करण्यापुर्वी, संबंधीत जिल्हाधिकारी यांस शासनाची पुर्व मान्यता घेणे आवश्यक राहील.

५. ज्याअर्थी, महाराष्ट्र शासन, महसूल व वनविभागाकडील शासन निर्णय क्र. जमीन-२०१८/प्र.क्र.९१/ज-१, दिनांक १६ नोव्हेंबर, २०१८ मधील तरतुदीनुसार या कार्यालयाकडील पत्र क्र. पमअ-१/कावि/१२०४/२०२२, दिनांक:- ०२/११/२०२२ अन्वये कळविलेली वार्षीक भुईभाडयाची रक्कम रु. ९९५७/- ही प्रतिग्रहिता यांनी दिनांक ०३/१२/२०२२ रोजी शासन जमा करुन चलन क्र. MH०११५९६४९८२०२२२३M व त्याचा डिफेसमेंट नंबर ०००५८०१६८८२०२२२३, दि. ०६/१२/२०२२ या कार्यालयास सादर केलेली आहे.

६. त्याअर्थी गी, डॉ. राजेश देशमुख, जिल्हाधिकारी, पुणे महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र. जमीन-२०१८/प्र.क्र.९१/ज-१, दिनांक १६ नोव्हेंबर. २०१८ व शासन ज्ञापन क्र. जमीन-३४१९/१३३६/प्र. क्र. २३८/ज-५, दि. ०१/१२/२०२२ मधील तरतुदीनुसार मला प्रदान असलेल्या अधिकारान्वये मौजे शेवाळवाडी-लांडेवाडी (चिंचोली), ता. आंबेगाव, जि. पुणे येथील श्री. भैरवनाथ शिक्षण प्रसारक मंडळ, लांडेवाडी (चिंचोली) यांचे शाळेच्या क्रिडांगणाकरीता भाडेपट्टयाने प्रदान करणेत आलेल्या १०७१६.०० चौ. मी. जागेस मुळ जागा प्रदान आदेशातील अटी व शर्तींच्या अधीन राहून त्याचप्रमाणे दिनांक:- १६/११/२०१८ चे शासन निर्णयामधील तरतुदीनुसार जमिनीच्या वार्षिक दर विवरणपत्रानुसार येणाऱ्या मुल्यांकनाच्या १०% रक्कमेच्या ०.१% इतकी रक्कम त्या-त्या वर्षीच्या वार्षिक भुईभाडयाची रक्कम म्हणून शासन जमा करणेबाबतच्या तसेच शासकीय जमीन प्रदान केलेबाबतचा नमुना १८ चा बोर्ड सदर जागेतील इमारत/सिमाभिंतीच्या दर्शनी भागावर प्रदर्शित करणेबाबतच्या अटीवर तसेच खांलील अटी व शर्तीवर दिनांक:- ०१/०१/२०१८ पासून दिनांक:- ३१/१२/२०४८ या ३० वर्षाकरीता भाडेपट्टयाची मुदतवाढ देण्यात येत आहे. ||

## अटी व शर्ती

१) प्रतिग्रहिता संस्था सदर जमीन भाडेपट्टादार वर्ग-२ म्हणून धारण करील.

२) शासन ज्ञापन क्र. जमीन-३४९५/२३३/प्र. क्र. पु. १२४६/ज-५, दि. ०७ ऑगस्ट, २००० व दि. ३० सप्टेंबर, २००० व या कार्यालयाकडील आदेश क्र. पमग/सीआर/१५००/तीन, दि. २१/१२/२००० या मुळ जागा प्रदान आदेशातील अटी व शर्ती प्रतिग्रहिता यांचेवर बंधनकारक राहतील.

३) सदर जागेचा वापर क्रिडांगण प्रयोजनासाठीच करावयाचा असून अन्य प्रयोजनासाठी जागेचा वापर केल्यास भाडेपट्टा रद्द करून प्रश्नाधिन जागेचा ताबा घेतला जाईल व कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई दिली जाणार नाही.

४) क्रिडांगण प्रयोजनासाठी भाडेपट्टयाने दिलेल्या प्रश्नाधिन जागेत कोणत्याही प्रकारचे / स्वरूपाचे बांधकाम करता येणार नाही.

५) मंजूर करण्यात आलेली जमीन संस्था भाडेपट्टेदार म्हणून धारण करील व शासनाच्या पुर्वपरवानगीशिवाय हस्तांतरीत / गहाण / तारण करणार नाही.

६) प्रश्नाधिन जमीनीच्या भाडेपट्टयाची मुदत संपण्यापुर्वीच जर सदर जमीन शासकीय प्रयोजनासाठी आवश्यक असल्यास जिल्हाधिकारी यांनी तशी नोटीस दिल्यापासून १५ दिवसाच्या आत शासनास विना तक्रार परत करावी लागेल.

७) भाडेपट्टयाची मुदत संपल्यानंतर भाडेपट्टाधारकाने जागेचा खुला ताबा विना तक्रार शासनास दिला पाहीजे.

८) सदर जागेतील दगड, मुरूम, माती इ. कोणत्याही प्रकारचे गौण खनिजाचे उत्खनन करू नये.

९) भाडेपट्टयाने मंजूर करण्यात आलेल्या क्षेत्राचा क्रीडांगण प्रयोजनासाठीच वापर करावा अन्य प्रयोजनासाठी शासनाच्या पुर्वमान्यतेशिवाय वापर करता येणार नाही. सदर क्षेत्राचे लगतचे क्षेत्रावर अतिक्रमण करू नये.

१०) मुळ जागा प्रदान आदेशातील सर्व अटी / शर्ती प्रतिग्रहिता संस्था यांचेवर बंधनकारक राहतील.

११) शासकीय जमीन भाडेपट्टयाने देताना अथवा भाडेपट्टयाने नुतणीकरण करताना करावयाचा करारनामा दस्त मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ नुसार निष्पादीत करणे बंधनकारक करण्यासंदर्भातील शासन परिपत्रक महसूल व वन विभाग क्रमांक संकीर्ण-०५/२००६/प्र.क्र.४३/ज-१, दि. ३१/१०/२००६ मधील मार्गदर्शक सुचनांचे तंतोतंत पालन करावे.

१२) पुणे जिल्हयाच्या मंजूर प्रादेशिक योजनेच्या क्षेत्रासाठी लागू असलेल्या एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीनुसार क्रिडांगण हा वापर अनुज्ञेय करताना सहाय्यक संचालक नगररचना पुणे यांनी घालुन दिलेल्या अटी शर्तीचे पालन करणे बंधनकारक राहील.

१३) शासकीय जमीन प्रदान केलेबाबतचा नमुना-१८ चा बोर्ड सदर जागेतील इमारत / सिमाभिंतीच्या दर्शनी भागावर प्रदर्शित करणे प्रतिग्रहिता संस्था यांचेवर बंधनकारक राहील.

१४) शासन निर्णय क्र. जमीन-२०१८/प्र.क्र.९१/ज-१, दिनांक १६ नोव्हेंबर, २०१८ मधील तरतुदीनुसार जमिनीच्या वार्षीक मुल्यदर तक्त्यानुसार येणाऱ्या मुल्यांकनाच्या १०% रक्कमेच्या ०.१% इतकी रक्कम त्या त्या वर्षाची वार्षीक भुईभाड्याची रक्कम म्हणुन शासन जमा करणेत यावी.

१५) दिनांक १६/११/२०१८ रोजीच्या शासन निर्णयामधील तरतुदीनुसार सदरच्या भाडेपट्टयाचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर, जर संबंधित शासकीय जमीन शासनास अथवा शासनाच्या नामनिर्देशित कोणत्याही शासकीय यंत्रणांना, कोणत्याही सार्वजनिक प्रयोजनार्थ अथवा सार्वजनिक प्रकल्पाकरिता आवश्यक असेल तर अशी जमीन परत ताब्यात घेण्याची मुभा जिल्हाधिकारी यांना राहील आणि अशा जमीनीचे नुतणीकरण करणे जिल्हाधिकाऱ्यास किंवा राज्य शासनास बंधनकारक राहणार नाही.

१६) प्रतिग्रहित्याने उपरोक्त शर्तीपैकी कोणत्याही शर्तीचा भंग झाल्यास जमीन विना मोबदला सरकार जमा होण्यास पात्र राहील.

(डॉ. राजेश देशमुख)
जिल्हाधिकारी पुणे.

प्रति,
अध्यक्ष, श्री. शिवाजीराव आढळराव पाटील,
श्री. भैरवनाथ शिक्षण प्रसारक मंडळ, लांडेवाडी (चिंचोली),
ता. आंबेगाव, जि. पुणे.

Chairman
Shree Bhairavnath Shikshan Prasarak Mandal
A/P. Landewadi (Chinchodi), Tal.Ambegaon, (Pune)